महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६२ वा | दिनांक : ३०/११/२०२४ | वार : शनिवार

# बाबा आढावांचे मोफत योजना व EVM विरोधात आंदोलन




**पुणे :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी सरकारच्या मोफत योजना आणि विधानसभा निवडणुकीतील ईव्हीएम मशीनमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत पुण्यातील महात्मा फुले वाड्यात आत्मक्लेश आंदोलन सुरु केले असून शुक्रवारी आंदोलनाचा दुसरा दिवस होता. वयाच्या ९५ व्या वर्षी बाबा आढाव यांनी आंदोलन करत सरकारला आव्हान दिले आहे.

आढाव म्हणाले, निवडणुकीत पैशांचा मोठ्या प्रमाणात वापर झाला आहे. राज्यघटना व लोकशाहीची सुरु असलेली थट्टा चर्चाचा विषय झाला असून त्याचा निषेध करण्यासाठी मी आत्मक्लेश आंदोलन करत आहे. लोकशाही वाचवणे महत्वाचे असून त्याबाबत नागरिकांनी जागरुक होणे गरजेचे आहे.

मी १९५२ पासून देशातील व राज्यातील प्रत्येक निवडणुकीचा साक्षीदार आहे. लाडकी बहीण योजना सारख्या मोफत पैसे वाटप योजना निवडणूक तोंडावरच का आणल्या गेल्या. त्याचप्रमाणे सरकार वेगवेगळ्या मोफत योजना देत असून त्या हिताच्या नाही. यंदाच्या राज्यातील निवडणुकीत पैशाचा धुडगूस करण्यात आला आहे. राज्यात ईव्हीएम घोटाळा देखील झाल्याचा आरोप होत आहे. त्याचप्रमाणे काँग्रेसने देखील लाडकी बहीण योजनेसारख्या योजनेत महिलांना दरमहा तीन हजार रुपये देण्याचे जाहीर केले, ही बाब देखील लांच्छनास्पद आहे.

काँग्रेस एका बाजूला उद्योगपती गौतम अदानी यांच्या विरोधात आंदोलन करते. परंतु त्यांच्या सोबतचे सहकारी शरद पवार अदानी यांच्या पाठीशी उभे राहतात. त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी आपण आता स्वस्थ बसणार नसून आत्मक्लेश आंदोलन करत आहे.

दरम्यान, बाबा आढाव यांची शुक्रवारी माजी मंत्री विश्वजीत कदम यांनी भेट घेतली. यापूर्वी माजी मंत्री छगन भुजबळ व आमदार रोहित पवार यांनी देखील आढाव यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

# बबनराव लोणीकरांची भाजपकडे मंत्रिपदाची मागणी



**परतूर :** महायुतीचा सरकार स्थापन करण्याचा तिढा अद्याप सुटला नाही. पण त्यानंतरही नव्या सरकारमध्ये मंत्रिपद मिळवण्यासाठी प्रचंड चढाओढ लागली आहे. अशात भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी मंत्रिपद देण्याची मागणी केली आहे. मी मराठवाड्यात सर्वात सिनीयर आमदार आहे. मी ४० वर्षांत शंभर रुपयाचाही अपहार केला नाही. इतकी वर्षे निष्कलंक राहणे ही साधी गोष्ट नाही. त्यामुळे मला मंत्रिपदाची संधी मिळावी, अशी मागणी लोणीकर यांनी देवेंद्र फडणवीसांकडे केली.

विधानसभा निवडणुकीत महायुतीत भरघोस यश मिळाले. भाजपच्या सर्वाधिक १३२ जागा निवडून आल्या आहेत. त्यानंतर आता विजयी उमेदवारांकडून आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. बबनराव लोणीकर यांनीही परतूर येथे कार्यकर्त्यांचा आभार मेळावा घेतला. यावेळी बोलताना त्यांनी आपण निष्कलंक असल्याचे सांगत देवेंद्र फडणवीसांकडे मंत्रिपदाची मागणी केली. तसेच महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला.

एकनाथ शिंदे यांनी मनाचा मोठेपणा दाखवला. देवेंद्रजींच्या रूपाने महायुतीच सरकार येत आहे. यावेळी मंत्री पदाची संधी मला मिळावी, असे मी देवेंद्र फडणवीस यांना म्हणालो. मी पाचव्यांदा आमदार झालो आहे. मराठवाड्यात मी सर्वात सीनियर आहे. मी भाजपचा ४० वर्षांपासून निष्ठावंत कार्यकर्ता आहे. या ४० वर्षात मी शंभर रुपयाचा देखील अपहार केला नाही. चाळीस वर्ष निष्कलंक राहणे साधी गोष्ट नाही, असेही बबणराव लोणीकर म्हणाले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# भाजपमध्ये एकही लाडकी बहीण मुख्यमंत्री पदाच्या योग्यतेची नाही का? : सुषमा अंधारे



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले. भाजपने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्याने मुख्यमंत्री त्यांचाच होणार हे निश्चित झाले आहे. मात्र, अद्यापपर्यंत मुख्यमंत्री पदाचा उमेदवार घोषित झाला नाही. यावरून ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. लाडक्या बहिणीचा गवगवा करणाऱ्या भाजपमध्ये एकही लाडकी बहीण मुख्यमंत्री पदाच्या योग्यतेची नाही का? असा सवाल अंधारे यांनी केला आहे. लाडक्या बहिणीला १५०० रुपये आणि राज्याची अख्खी तिजोरी लाडक्या भावाच्या हातात, हे किती दिवस चालणार, अशी टीकाही सुषमा अंधारे यांनी केली.

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून सहा दिवस झाले, पण अद्यापही सरकार स्थापन झाले नाही. आता ५ डिसेंबर रोजी शपथविधी होणार असल्याची चर्चा आहे. यावरूनही सुषमा अंधारे यांनी महायुतीला धारेवर धरले.

महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आले असते आणि ४८ तासांत सरकार स्थापन केले नसते, तर राष्ट्रपती राजवट लागू केली जाईल, असे म्हटले जात होते. मग आता ५ डिसेंबर रोजी सरकारचा शपथविधी होणार असेल, तर तोपर्यंत राज्य कुणाच्या भरवशावर राहील? असा सवाल सुषमा अंधारे यांनी केला.

आता सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपचा मुख्यमंत्री अजून ठरत नाही. भाजप ज्या लाडक्या बहिणीचा गवगवा करत आहे, त्या लाडक्या बहिणींना सत्तेमध्ये वाटा मिळणार का? असेही त्या म्हणाल्या. लाडक्या बहिणीला १५०० रुपये आणि राज्याची अख्खी तिजोरी लाडक्या भावाच्या हातात, असे किती दिवस चालणार. भाजपमध्ये एकही लाडकी बहीण मुख्यमंत्रिपदाच्या योग्य नाही का? असा सवालही अंधारे यांनी केला.

२८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेत भाजप प्रणित महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. त्यानंतर आता नव्या सरकारचा शपथविधी केव्हा होणार? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या चर्चेतच आता नव्या मंत्रिमंडळाची रचना एकनाथ शिंदे सरकारसारखीच असल्याचे स्पष्ट झाले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, नव्या सरकारमध्ये १ मुख्यमंत्री, २ उपमुख्यमंत्री व ३२ मंत्री असतील. महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात अदिती तटकरे, देवयानी फरांदे आणि श्वेता महाले यांचा मंत्रिपद मिळणार असल्याची चर्चा आहे.

महायुतीच्या मुख्यमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटला नाही. केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्यासोबतच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे. पण राजकीय वर्तुळात भाजप ऐनवेळी मराठा कार्ड खेळण्याची शक्यता असल्याचीही चर्चा सुरू आहे. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राजकीय वर्तुळात पंकजा मुंडे यांच्या नावाची मुख्यमंत्री म्हणून चर्चा सुरू असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे भाजप राज्याला पहिली महिला मुख्यमंत्री देणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० नोव्हेंबर २०२४


## आज पंढरीनाथ मुंढे स्मृतीसंगीत महोत्सव



**छ. संभाजीनगर :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि वासंती संगीत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ह.भ.प.वै. पंढरीनाथ मुंढे यांच्या स्मृतीप्रित्यार्थ संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार ३० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६:३० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, रॉक्सी टॉकीज समोर येथे होणाऱ्या या संगीत महोत्सवात प्रसिद्ध बासरी वादक पंडित राजेंद्र कुलकर्णी यांचे बासरीवादन होणार असून तबला वादक सई बारबोटे या त्यांना साथसंगत करणार आहेत. याच कार्यक्रमात यशवंत वैष्णव यांचे एकल तबला वादन होणार असून निलय साळवी हे संवादिनीवर साथसंगत करणार आहेत.

या संगीत महोत्सवाचे उद्घाटन स. भू. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमास लक्ष्मीकांत महाराज पारनेरकर यांचे आशिर्वाद आहेत.

या महोत्सवासाठी शहरातील सर्व संगीत प्रेमींना उपस्थित राहून आस्वाद घ्यावा असे आवाहन मुख्य आयोजक भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे राजेश मुंढे, वासंती संगीत संस्थेचे प्रशांत बारबाटे आणि निमंत्रक प्रा. महेश अचिंतलवार यांनी केले आहे.






## काँग्रेस संघटनेत बदलाची गरज : खरगे



**नवी दिल्ली :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवाबाबत काँग्रेस कार्यकारिणीची (CWC) शुक्रवारी दिल्लीत बैठक झाली. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले - निवडणुकीच्या निकालाने निराश होऊ नये. पक्ष मजबूत करण्यासाठी वरपासून खालपर्यंत बदल आवश्यक आहेत.

खरगे यांनी बैठकीत पुन्हा एकदा ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले- ईव्हीएमने निवडणूक प्रक्रिया संशयास्पद बनवली आहे, निवडणूक आयोगाने मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घ्यायला हव्यात.

खरगे म्हणाले की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील निकालाची कोणतीही आकडेवारी समर्थन करू शकत नाही. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने (MVA) ज्या प्रकारे कामगिरी केली, ते पाहता विधानसभा निकाल पाहून चांगले चांगले चाणक्यही संभ्रमात पडले आहेत.

खरगे म्हणाले- राज्यातील निवडणुकीत अपेक्षेपेक्षा कमी कामगिरी हे आमच्यासाठी आव्हान आहे. पक्षश्रेष्ठींमध्ये ऐक्याचा अभाव आणि एकमेकांविरोधातील भाषणबाजीमुळे निवडणुकीत आपले नुकसान होत असून, कडक शिस्तीची गरज आहे. पक्ष मजबूत करण्यासाठी तळागाळापासून एआयसीसीमध्ये बदल करावे लागतील.

बैठकीत खरगे म्हणाले - निवडणुकीचे वातावरण आमच्या बाजूने असल्याने विजयाची हमी मिळत नाही. कालबद्ध रणनीती आखून पक्ष मजबूत करण्यासाठी मेहनत घ्यावी लागणार आहे. विधानसभा निवडणुकीची तयारी वर्षभर अगोदर करावी लागेल, मतदार याद्या तपासाव्या लागणार आहेत.

खरगे म्हणाले- महाराष्ट्रात आकडेवारीच्या निकालाला कोणीही न्याय देऊ शकत नाही. MVA लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पोल्स चाणक्यही संभ्रमात आहेत. आम्हाला आमची निवडणूक रणनीती सुधारायची आहे. चुकीची माहिती आणि चुकीच्या माहितीचा प्रतिकार करण्याचे मार्ग विकसित करावे लागतील.

देशभरात जनतेचा अजेंडा राबविण्यास मदत होणार असल्याने काँग्रेसचे सत्तेत येणे महत्त्वाचे आहे, असे खरगे म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या चांगल्या निकालानंतर विधानसभा निवडणुकीच्या निकालाने आम्हाला धक्का बसला असून, आम्हाला कठोर पावले उचलावी लागतील, असे ते म्हणाले.

५खरगे म्हणाले- अनेक गोष्टी आहेत. मणिपूरपासून संभलपर्यंतचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. आपल्या अपयशावरून देशाचे लक्ष वळवण्यासाठी भाजप विविध माध्यमांतून अनेक धार्मिक मुद्द्यांवर प्रसारित करण्याचा प्रयत्न करत आहे. सत्तेत असलेल्या फुटीरतावादी शक्तींना कोणत्याही किमतीत पराभूत करायचे आहे. कारण आपण हा अद्भुत देश घडवला आहे.

## एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात महायुतीने धाडसी निर्णय घेतले : शंभूराज देसाई



**मुंबई :** एकनाथ शिंदेच्या नेतृत्वात महायुती सरकारने धाडसी निर्णय घेतले, त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात महायुतीला प्रचंड यश मिळालेले आहे. त्यामुळे साहजिकच त्या प्रमाणात वाटा मिळावा, त्या प्रमाणात सत्तेत सहभाग असावा, ही अपेक्षा ठेवणे चुकीची नाही, असे शिवसेना नेते शंभुराज देसाई यांनी म्हटले आहे.

शंभुराज देसाई पुढे बोलताना म्हणाले की, ठाकरे गटाचे संख्याबळ इतके कमी झाले यांचे कारण संजय राऊत हे आहेत. ह्या राऊतांमुळेच ठाकरे गटाची ही अवस्था झाली. संजय राऊतांच्या हातात आता काहीच उरलेले नाही, असा टोला त्यांनी माध्यमांशी बोलताना लगावला आहे. तर आजचा आणि उद्याचा दिवस वाट बघा समन्वयातून निश्चितपणे अत्यंत सकारात्मक मार्ग निघेल.

शंभुराज देसाई म्हणाले की, माननीय संजय राऊतांनी त्यांच्या प्रदीर्घ राजकीय अनुभवाचा आणि विश्वविख्यात प्रवक्ते पदाचा फायदा घेऊन महाविकास आघाडीचा किंवा उबाठाचा विरोधी पक्षनेताही करता येतो का हे बघावे, असा खोचक टोला शंभूराज देसाईंनी संजय राऊत यांना लगावला.

संजय राऊत म्हणाले होते की, महायुतीत ३ पक्ष एकत्र आहेत. त्यांत भाजपला १३२ पेक्षा जास्त जागा मिळाल्या आहेत तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला ५० हून अधिक तर अजित पवारांच्या पक्षाला ४० हून अधिक उमेदवार निवडून आणले आहेत. त्यामुळे मंत्रिमंडळ वाटप कसे करायचे हा त्यांचा प्रश्न आहे. इतकं प्रचंड बहुमत मिळूनसुद्धा मुख्यमंत्री ठरवायला आणि सरकार स्थापन करायला ८ दहा दिवस लागताय. मुख्यमंत्री ठरवायला त्यांना बैठकांवर बैठका घ्याव्या लागतात. पण मुख्यमंत्री ठरला असेल तर आम्ही त्याचे स्वागत करु शेवटी राज्याचा मुख्यमंत्री आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० नोव्हेंबर २०२४


## संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्यानिमित्त ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता




**मुरुम, ता. उमरगा येथे टाळकरी बाल कलाकारांनी महाराष्ट्राची संस्कृती जपणाऱ्या टाळकरी बाल कलाकारांनी महाराष्ट्राची संस्कृती जपणाऱ्या वारकरी संप्रदायातील विविध कला प्रकार आपल्या अनोख्या बळीराजाची आपल्या बैलांप्रती असलेला आदरभाव कृतीतून सादर करताना**

**मुरुम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील सोनार गल्लीतील कुलकर्णी परिवाराच्या वतीने गतवर्षीपासून संत श्री ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्याच्या निमित्ताने ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षी ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करून ता. २२ ते २८ नोव्हेंबर पर्यंत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या दरम्यान दररोज महाराष्ट्रातील नामांकित प्रवचनकार, कीर्तनकार, भारुड कलाकार, गायन अशा विविध कार्यक्रम झाल्याचे आयोजक श्रीराम सुभाष कुलकर्णी यांनी सांगितले. सप्ताह समाप्तीच्या निमित्ताने संत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेची भव्य पालखी नगर प्रदक्षिणा बुधवारी (ता. २८) रोजी घालत शहरातून मिरवणूक काढण्यात आली. सोनार गल्लीतून पालखी नगर प्रदक्षिणा गांधी चौक, हनुमान चौक, अशोक चौक, कुंभार विहीर मार्गे किसान चौक, सुभाष चौक ते सोनार गल्ली अशी प्रदक्षिणा पूर्ण केली.

प्रत्येक चौकात टाळकरी बाल कलाकारांनी महाराष्ट्राची संस्कृती जपणाऱ्या वारकरी संप्रदायातील विविध कला प्रकार आपल्या अनोख्या पद्धतीने दाखवत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यात बळीराजाची आपल्या बैलांप्रती असलेल्या आदराबद्दलचा कृतीभाव, नटखट अदाकारी करत फुगडी खेळ तसेच विठ्ठल रखुमाईच्या भक्तांनी निरागस भावनेतून दाखवलेला अनोखा भक्तीचा संगम याशिवाय विविध खेळांचे सादरीकरण या बालकलाकारांनी केले. पालखी सोहळा मार्गावर भक्तांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. याप्रसंगी प्रत्येक घरासमोर आकर्षक रांगोळ्या काढून आलेल्या पालखीचे उत्साहात स्वागत केले. पालखी सोहळा किसान चौकात दाखल झाल्याबर टाळकरी वारकऱ्यांकरिता अल्पोपराची सोय केली होती. सोहळ्यानिमित्त प्रसिद्ध कीर्तनकार गुरुराज महाराज देगलूरकर यांचे काल्याचे किर्तन पार पडले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## मका व्यापाऱ्याकडून शेतकऱ्याची फसवणूक झाल्याची तक्रार

**कन्नड (अरुण थोरात):** कृषी उत्पन्न बाजार समितीत मका विक्री साठी आणलेल्या शेतकऱ्याची व्यापाऱ्याने फसवणूक केल्याची तक्रार निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी, तहसिलदार, सहायक सहकारी निबंधक संस्था कन्नड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बद्रिनाथ धर्मू राठोड यांनी दि. २८ नोव्हेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीत आपल्या मका विक्रीसाठी आणला होता.

नियमानुसार लिलाव करण्यात आला. लिलावापूर्वी मका चे मॉइश्चर काढण्यात आले. बोली लावलेल्या एका व्यापार्याने लिलावानुसार १९७५ रुपये प्रती क्विंटल भाव ठरवून पावती देण्यात आली.

व्यापाऱ्याने मक्याचा ट्रॅक्टर पाणपोई येथील गोडावून मध्ये खाली करण्याचे सांगितले, सदरील शेतकरी गोडावून मध्ये गेले असता. व्यापाऱ्याने तुमच्या मक्याचे मॉइश्चर बरोबर नसल्याने १८०० रुपये भाव देऊ असे सांगितले. परंतू सदरील शेतकऱ्याने ठरल्यानुसार पैशांची मागणी केली असता. व्यापाऱ्याने आरेरावीची भाषा करुन अपमानीत केले.

तुझ्याकडून जे होईल ते कर असे सांगत खाली केलेला ट्रॅक्टर परत भरायला लावून गोडावून मधून हाकलून दिले.

सदरील शेतकऱ्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी सदरील व्यापारी व बाजार समिती ची चौकशी करुन फसवणूकीचा गुन्हा दाखल करुन परवाना रद्द करण्यात यावा. अन्यथा उपोषण करण्याचा ईशारा या निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर एस.एम.मोटे, योगेश पवार, रामेश्वर बोरसे, नवनाथ राठोड, बिनू राठोड, यांच्या सह्या आहेत.

लिलाव हे अत्यंत सोप्या व सरळ पद्धतीने होतात मॉइश्चर सर्व शेतकऱ्यां समोर काढला जातात आणि त्यांना स्पष्ट सूचना दिल्या जातात की जो म** खाल्यावर गोडाऊन वर जाईल त्या मालाचं मॉइश्चर आणि हा मोश्चर सेम पाहिजे तरच हा भाव राहील परंतु काही काही लोकांना सवय झाली आहे पत्रकाराची नेत्याची धमकी देऊन आपला खराब माल चांगला आहे सांगून तोडी पाणी करून घ्यायची म्हणून सदरील मालाचा आम्ही संपूर्ण व्हिडिओ काढलेला आहे फक्त आम्हाला नको त्या गोष्टीत पडून चालू असलेला चांगलं मार्केट बंद नाही करायचं म्हणून आम्ही सदरील व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा भाव देत नाही. त्याला शुभेच्छा आहेत त्यांनी कुठेही तक्रार करावीत आणि ज्या पत्रकाराला नेत्याला कार्यकर्त्याला शंका असतील त्यांनी जागेवर येऊन याची शहानिशा करावी"

- मनोज राठोड - सभापती- कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड

**बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.**

## सुप्रीम कोर्ट म्हणाले- ब्रेकअप म्हणजे आत्महत्येस प्रवृत्त करणे नव्हे



**नवी दिल्ली :** सुप्रीम कोर्टाने शुक्रवारी दिलेल्या निर्णयात म्हटले आहे की, ब्रेकअप किंवा लग्नाचे वचन मोडणे म्हणजे आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे होऊ शकत नाही. तथापि, जेव्हा अशी वचने मोडली जातात, तेव्हा ती व्यक्ती भावनिकरित्या अस्वस्थ होऊ शकते. जर त्याने आत्महत्या केली तर त्यासाठी इतर कोणाला दोषी मानता येणार नाही.

आपल्या निर्णयात, सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय बदलला, ज्यामध्ये आरोपी कमरुद्दीन दस्तगीर सनदीला त्याच्या मैत्रिणीसोबत फसवणूक आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले. उच्च न्यायालयाने आरोपीला ५ वर्षांचा तुरुंगवास आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती.

न्यायमूर्ती पंकज मित्तल आणि उज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. हा खटला फौजदारी खटला मानण्याऐवजी त्यांनी सामान्य ब्रेकअप केस मानून शिक्षा रद्द केली आहे. मात्र, न्यायालयापूर्वी ट्रायल कोर्टानेही आरोपीची निर्दोष मुक्तता केली होती.

२००७ मध्ये आरोपी कमरुद्दीनने ८ वर्षांच्या रिलेशनशिपनंतर प्रेयसीसोबत लग्न करण्यास नकार दिला होता. यानंतर २१ वर्षीय तरुणीने आत्महत्या केली. तिच्या आईने तरुणाविरुद्ध एफआयआर दाखल केला. ट्रायल कोर्टाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली, परंतु उच्च न्यायालयाने त्याला कलम ४१७ (फसवणूक) आणि कलम ३०६ (आत्महत्येला प्रवृत्त करणे) अंतर्गत दोषी ठरवले आणि त्याला ५ वर्षांची शिक्षा सुनावली. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले.

आरोपीचे मुलीसोबत शारीरिक संबंध असल्याचे तपासात सिद्ध होऊ शकले नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे. तसेच, आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोपही खरा ठरला नाही. अशा परिस्थितीत मुलाला शिक्षा करणे योग्य नाही.

## एजाज खानच्या पत्नीला ड्रग्ज प्रकरणात अटक



**मुंबई :** बिग बॉस सीझन ७ फेम एजाज खानची पत्नी फॉलन गुलीवाला हिला सीमाशुल्क विभागाने ड्रग्ज प्रकरणात अटक केली आहे. एजाज खानच्या घरातून मोठ्या प्रमाणात ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. त्याच्यावर ड्रग्जची तस्करी केल्याचा आरोप आहे. छापेमारीनंतर एजाज खान बेपत्ता असून, सीमा शुल्क विभाग आता अभिनेत्याचा शोध घेत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी कस्टम विभागाने एजाज खानच्या जोगेश्वरी येथील घरावर छापा टाकला होता. यावेळी त्यांना तेथून अनेक औषधे आणि १३० ग्रॅम गांजा सापडला. जो कस्टम विभागाने जप्त केला. यानंतर अभिनेत्याच्या पत्नी फॉलनला अटक करण्यात आली.

एजाज खानसाठी काम करणाऱ्या सूरज गौरला कस्टम विभागाने ८ ऑक्टोबर २०२४ रोजी अटक केली होती. कुरिअरद्वारे १०० ग्रॅम मेफेड्रोन किंवा एमबीएमए ऑर्डर केल्याबद्दल कर्मचारी सदस्याला अटक करण्यात आली. हे ड्रग्ज एजाज खानच्या बी-२०७, ओबेरॉय चेंबर्स, अंधेरी येथील वीरा देसाई इंडस्ट्रियल इस्टेट या कार्यालयाच्या पत्त्यावर पोहोचवली जाणार होती. सूरज गौर विरुद्ध नार्कोटिक ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स (NDPSC) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२०२१ मध्ये देखील एजाज खानला नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने (NCB) अटक केली होती. जेव्हा अभिनेत्याकडे ३१ अल्प्राझोलम गोळ्या सापडल्या. त्यानंतर जवळपास २६ महिने तुरुंगात राहिल्यानंतर त्याची सुटका झाली.